ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 12 | SEPTEMBER - 2017

REVIEW OF RESEARCH

# वारकरी संप्रदाय : एक समग्र अवलोकन

*एस. पी. खुपसे*
*सहाय्यक प्राध्यापक , मराठी विभाग , तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान, महाविद्यालय सेनगांव जि. हिंगोली.*

*प्रस्तावना :—*



नाथपंथाशी संबंध्द असलेला वारकरी अथवा भागवत संप्रदाय अनेक कारणांमुळे महाराष्ट्रातील अग्रपूजेचा मानकरी ठरतो. हा संप्रदाय गेली सात शतके समाजाच्या सर्व स्तरांवर संस्कार करीत आलेला आहे. या संप्रदायास आजच्या युगाच्या संदर्भात पुरोगामी समजावयाचे अथवा प्रतिगामी मानावयाचे याविषयी मतभेद होऊ शकतील. तथापी इतिहासकाळात समाजात धर्म, संस्कृती आणि सदाचार यांचा प्रसार करण्याची महत्वाची कामगिरी या संप्रदायाने बजावलेली आहे. सामाजिक समतेचाही प्रसार या पंथाने आपापल्या परीने केलेला आहे. या विषयी दुमत होण्याचे कारण नाही. या संप्रदायाने केलेल्या कार्याचे मूल्यमापन आज प्रचलित असलेल्या मूल्यांच्या आधारे न करता तत्कालीन परिस्थीती आणि समाजजीवन लक्षात घेऊन करणे संयुक्तीक ठरेल.

मध्ययुगीन महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या पंथोपपंथापैकी एक संप्रदाय एवढेच वारकरी संप्रदायाचे स्थान नक्कीच नाही. तेराव्या शतकात सुरु झालेली व आजवर अखंडितपणे चालू असलेली ती एक धर्मिक व सामाजिक चळवळ आहे. तिचे परिणाम साहित्य व समाजजिवन या दोहोंवरही झालेले आहेत. हि चळवळ संस्कृती—संरक्षण आणि समाज—प्रबोधन या दोहांशी निगडीत आहे. पांडुरंग या संप्रदायाचे अराध्य दैवत असले तरी, इतर देवदेवतांचा अधिक्षेप या संप्रदायाने कधीच केलेला नाही. जनता जनार्दन आणि विठ्ठलाच्या रुपात सर्व देवदेवता पाहण्याची व्यापक दृष्टी या संप्रदायाने महाराष्ट्राला दिली आहे. या दृष्टीकोनामुळे भिन्न कुलपरंपरा विठ्ठल भक्तीच्या आड येऊ शकल्या नाहीत. या व्यापक अधिष्ठानामुळे या संप्रदायाला वर्णभेदावरही मात करता आली.

तसे पाहिले तर आधुनिक भारतीय भाषांच्या उदयकाळापासूनच देशाच्या निरनिराळया भागात वेगवेगळे भक्ती संप्रदाय अस्तित्वात होते. या भाषांतील साहित्याला आणि त्या त्या भाषिक प्रदेशातील समाजजीवनाला वळण लावून सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करण्याचे कार्य या भक्ती संप्रदायांनी आपापल्या प्रदेशात केले. तुलनात्मक दृष्टया विचार केला असता मात्र महाराष्ट्रातील भागवत संप्रदाय अन्य भक्तीसंप्रदायाच्या मानाने निराळा असल्याचे प्रत्ययास येते. महाराष्ट्रातील भागवत संप्रदायात एकांतिक भक्ती आधारसूत्र मानलेली नाही. या परंपरेने भक्तीची निष्काम कर्मयोगाशी सांगड घातली आहे. विठ्ठलाच्या सगुण मूर्तीचे भजन, आराधना करुन अंतिमतः परब्रम्हे निर्गुण आणि निराकार आहे याचा विसर या पंथाला पडलेला नाही. षेदी जैसा वर्णिला तैसा विटेवरी देखिलाऽ असे वारकरी विश्वासाने सांगतात. ‘कर्मे इशु भजावा’ हे सुत्र ज्ञानदेवानींच सांगीतलेले असल्याने प्रपंचत्याग आणि कर्मसंन्यास यांना या संप्रदायात स्थान मिळाले नाही. हा पिंड ब्रम्हांडाच्या एकरुपतेप्रमाणेच जिवा—शिवाचे अद्वेत मानतो. ‘जे जे भेटे भूत । त्या त्या मानी भगवंत’ अशी या भक्तीयोगाची धारणा आहे. विश्व आभासात्मक नसून ते परमेश्वराइतकेच सत्य आहे. असा या संप्रदायाचा उपदेश आहे. ज्ञानेश्वरांची विश्वात्मक देवाची संकल्पना या भूमिकेवरुन समजून घेतली पाहिजे.

युगसापेक्ष परिवर्तन हा भारतीय संस्कृतीचा एक प्रकृतिधर्म आहे. या प्रकृतीधर्माचे दर्शन वारकरी संप्रदायाच्या इतिहासातही घडते. ‘आम्हा सापडले वर्म, करु भागवत धर्म’ ही संत नामदेवांची घोषणा या प्रकृतीधर्माची निदर्शक आहे. धर्माला ग्लानी आली असतांना धर्मसंस्थापनार्थ आणि अधर्मनिर्मूलनार्थ भगवंत अवतार घेत असतो. असे गितेचे अश्वासन आहे. या कार्यांसाठी संतांचे अवतार वेळोवेळी होत असतात यावर वारकरी संप्रदायाचा विश्वास आहे. अनेक संतवचनातून तो व्यक्त होतो. गीतोक्त भागवतधर्माचे ज्ञानदेवांनी प्रवर्तन केले. या परंपरेला भागवताची जोड देऊन संत एकनाथांनी भागवत धर्मास काळसापेक्ष रुप देऊन ही परंपरा चालविली. या संप्रदायात भक्ती भजनापुरती मर्यादित नाही. ती निष्काम कर्मयुक्त आहे. ‘कैवल्याने परते सर’ म्हणावे एवढी तिची थोरवी आहे. आणि मुख्य म्हणजे तो परमेश्वराचा ‘सहजप्रकाश’ आहे.

ज्ञानेश्वरानंतर सुमारे दोन शतकांची ‘अंधारयात्रा’ घडल्यानंतर काळाच्या ओघात मलिन झालेल्या भागवतधर्माचे पुनरुज्जीवन संत एकनाथांनी केले. यामुळे सोळाव्या शतकात भागवतधर्माचा वृक्ष पुन्हा टवटवीत झाला. काळसापेक्ष निकडीमुळे नाथोक्त भागवतधर्मात स्वधर्मरक्षणास प्राधान्य मिळाले. परसत्ता आपल्या धर्माचा प्रसार सत्तेच्या बळावर करीत असतांना स्वधर्माचे रक्षण त्या काळात महत्वाचे होऊन

बसले होते. 'भावार्थ रामायण' या ग्रथाची रचनाच मुळात स्वधर्मरक्षणाच्या प्रेरणेतून झालेली आहे. ज्ञानेश्वरांची विश्वात्मक देवांची कल्पना नाथ साहित्यात जनी जनार्दनाच्या रुपात व्यक्त झाली आहे.

ज्ञानेश्वर काळात नसलेला एक परिस्थितीजन्य घटक मध्ययुगीन महाराष्ट्रात अस्तित्वात होता. परधर्मिय सत्ता स्वधर्माचा उच्छेद करण्यास बध्दपरिकर झालेली असल्याने आचार सुलभ धर्ममार्ग आणि स्वधर्म आणि संस्कृती यांचे संरक्षण या दोन्ही आघाडयावर मध्ययुगीन साधुसंतांना आणि समाजालाही तोंड द्यावे लागले. एकनाथोत्तर संत साहित्यात या जाणिवा आढळतात. परिस्थितीतून मार्ग कसा काढायचा याचे मार्गदर्शनही या साहित्याने केले आहे. त्यामुळे या कालावधीत साहित्यास अध्यात्मप्रतिपादन आणि समाजप्रबोधन ही दोन्ही अंगे असलेली दिसून येतील.

संत एकनाथानंतर होऊन गेलेले संत तुकाराम अनेकार्थानी वारकरी संप्रदायाचे कळस ठरतात. एक तर त्यांच्या अवतार समाप्तीनंतर त्यांच्या तोडीचा संत वारकरी संप्रदायात झाला नाही. त्यांच्या नंतर वारकरी संप्रदायाचा विकास थांबला. वारकरी परंपरा आजही चालू असली तरी पुढच्या काळात युगसापेक्षतेची जोड वारकरी संप्रदायास मिळाली नाही. या दृष्टीनेही संत तुकाराम वारकरी संप्रदायाचे कळस ठरतात. तरीही इतर पंथोपंथ आणि वारकरी संप्रदाय यांना समान लेखता येत नाही कारण, वारकरी संप्रदाय दीर्घकाल महाराष्ट्राचा समाजधर्म या नात्याने नांदलेला आहे. महिकावतीच्या बखरीत ज्या महाराष्ट्राचा ध्यास आढळतो तो वारकरी संप्रदायाच्या संतांनी आणि त्यांच्या अनुयायांनी जोपासला व वाढविलाही. प्रतिकूल परिस्थितीमुळे खचून न जाता अनुकूल काळ उजाडेपर्यंत आवश्यक असलेले मनोबल या पंथाने महाराष्ट्राला पुरविले आहे. समाजाने दीर्घकाल केलेल्या तपश्चर्येने 'महाराष्ट्रधर्मरक्षिका' प्रसन्न झाली आणि स्वराज्याचे वरदान महाराष्ट्राला लाभले. म्हणून न्या. रानडे यांनी संतांचा भागवतधर्म आणि महाराष्ट्रधर्म एकरुप असल्याचे प्रतिपादन केले.

ही चळवळ नामदेवाचा जन्मा झाल्यापासून ते गेल्या शतकाच्या अखेरीपर्यंत चालू राहून पारमार्थिक सदगुणांची हळूहळू वाढ झाली. या देशाल प्राकृत भाषेत एक बहुमोल वाङमय या चळवळीमुळेच आम्हाला उपलब्ध झाले. ज्ञातिजन्य वेडगळ कल्पनांचा जोरही या वाङमयानेच कमी झाला. शुद्र वर्णाला पारमार्थिक शिक्षण देऊन त्यांचे समाजामध्ये महत्व वाढविले. परधर्मी सत्तेच्या ठिकाणी एकजुटीची एतदेशीय सत्ता पुन्हा स्थापित करण्याच्या महान कृत्यात पुढारीपण घेण्यास महाराष्ट्र देशाची तयारी या चळवळीने करुन दिली. तशी तयारी हिंदुस्थानातील कोणत्याही देशांची झाली नाही. महाराष्ट्र धर्माची मूलतत्वे आम्हाला वारकरी संप्रदायात हिच दिसतात.

### *निष्कर्ष :*

1. वारकरी संप्रदायाची चळवळ संस्कृती संरक्षण आणि समाज प्रबोधनाशी निगडीत आहे.
2. विठ्ठलाच्या स्वरुपात सर्व देवदेवताना पाहण्याची व्यापक दृष्टी वारकरी संप्रदायांनी महाराष्ट्राला दिली.
3. ब्रम्हांडाच्या एकरुपतेप्रमाणेच जिवा–शिवाचे अव्देत वारकरी संप्रदाय मानतो.
4. प्रकृत्ती धर्माचे दर्शन वारकरी संप्रदायाच्या इतिहासात घडते.
5. परिस्थितीतून मार्ग कसा काढायचा यांचे मार्गदर्शन वारकरी संप्रदायाने केले आहे.
6. वारकरी संप्रदाय दिर्घकाल महाराष्ट्राचा समाजधर्म या नात्याने नांदलेला आहे.

### *संदर्भः*

1.संत वाङमयाची सामाजिक फलश्रुती – प्रा. गं. बा. सरदार
2.मराठी संतांचे सामाजिक कार्य – डॉ. विष्णु भिकाजी कोलते
3.महाराष्ट्रातील पाच संप्रदाय – पं. रा. मोकाशी
4.यादवकालीन महाराष्ट्र – मु. ग. पानसे
5.संतवचनामृत – प्रा. रा. द. रानडे
6.मध्ययुगीन संत साहित्य : काही आयाम – डॉ. यु. म. पठाण
7.संत साहित्य चिंतन – डॉ. यु. म. पठाण

